# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### परिपत्रक क्र. ८३/२०२२

### विषय: पीएच्.डी. अभ्यासक्रम दुसरी प्रवेश फेरी प्रक्रिया २०२१-२२

सदर परिपत्रकाद्वारे मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, मा.प्राचार्य, सर्व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन संस्था तसेच पात्र पीएच्.डी. प्रवेश इच्छुक विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रम २०२१ साठी पहिली प्रवेश फेरी पूर्ण झाली आहे. पहिल्या फेरीतील पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी भरलेल्या जागा विचारात घेऊन उर्वरित रिक्त जागा भरण्यासाठी तसेच नव्याने मिळालेल्या मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शकांना व पदोन्नतीने प्रवेशासाठी वाढलेल्या अधिकच्या जागा भरण्यासाठी तातडीने दुसऱ्या प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मार्गदर्शकांसाठी रिक्त जागा अद्ययावत करण्याची प्रक्रिया:**

१. मार्गदर्शकांनी आपल्या BCUD Online च्या Teacher Login व्दारे Login करावे.
   - Login झाल्यानंतर Vacant Position for Ph.D. Admission 2021 या मधून Link Open करावी.
   - Declare Vacancies या टेबल मधील Edit बटनावर Click करावे.
   - मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना खालील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.
     - Approval संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.
     - PG Recognition/Research Guide Details संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.

२. विद्यापीठ परिपत्रकानुसार नव्याने मान्यता प्राप्त मार्गदर्शक, पदोन्नतीने संशोधक विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व पीएच्.डी. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यामुळे झालेल्या रिक्त जागा इत्यादी सर्व पात्र मार्गदर्शकांनी आपल्या लॉगीनमधून ऑनलाईन पद्धतीने दि.१७/०४/२०२२ पर्यंत अद्ययावत कराव्यात.

३. मार्गदर्शकाकडे रिक्त जागा नसल्यास BOD Login मधून शून्य जागा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

**विद्यापीठ विभाग/संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्रासाठी तसेच संशोधन मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक सूचना:**

सर्व विद्यापीठ विभाग/संलग्नित संशोधन केंद्र यांनी खालीलप्रमाणे पीएच.डी. अभ्यासक्रम २०२१ च्या दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण करावी.

१. संशोधन मार्गदर्शकांनी त्यांच्या BOD Login मधून त्यांच्याकडील रिक्त जागांची माहिती दि. १७/०४/२०२२ पर्यंत भरावी
२. संशोधन केंद्रांनी त्यांच्याकडील सर्व विषयांच्या पीएच्.डी. प्रवेश प्रक्रीयेसाठी उपलब्ध प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती BOD Login मधून दि. १८/०४/२०२२ ते दि.२२/०४/२०२२ पर्यंत भरावी.
३. सर्व संशोधन केंद्रांनी रिक्त जागा दर्शवितांना संबंधित मार्गदर्शकाचे वैध मार्गदर्शक मान्यतापत्र असल्याची खातरजमा करावी.
४. मार्गदर्शक संशोधन केंद्राबाहेरील असल्यास विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात सेवेत असावा.
५. सर्व संशोधन केंद्रांनी वरील सर्व प्रक्रिया दि.२२/०४/२०२२ पर्यंत पूर्ण करावी. दि. ०२/०५/२०२२ नंतर महाविद्यालय/विभागाच्या BOD Login मध्ये त्यांच्या संशोधन केंद्रासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
६. सर्व संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांनी दि. ३१/०५/२०२२ पर्यंत दुसऱ्या फेरीतील मुलाखत प्रक्रिया पूर्ण करून मुलाखत अहवाल स्वयंस्पष्ट शेऱ्यासह (Selected/Non Selected) व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह online पध्दतीने भरून त्याच्या छापील प्रती शैक्षणिक प्रवेश विभागात जमा कराव्यात.
७. प्रवेश यादीस अंतिम स्वरूप देतांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रवर्गाची अदलाबदली करू नये. आरक्षणाच्या नियमानुसार त्या-त्या प्रवर्गासाठी असलेले आरक्षित जागेवर त्याच प्रवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करावी.
८. अराखीव (unreserved) प्रवर्गातील उमेदवाराकडे शासन निर्गमित आर्थिक दुर्बल घटकात मोडत असल्याचे (EWS) २०२१-२०२२ मध्ये निर्गमित झालेले प्रमाणपत्र उपलब्ध असेल तर EWS या प्रवर्गामध्ये त्या विद्यार्थ्यांची निवड करता येईल.
९. संशोधन केंद्र मान्यता पत्र शैक्षणिक वर्ष २०२०-२१/२०२१-२२ चे असल्या शिवाय प्रवेश प्रक्रिया करू नये.

१०. Ph.D. Admission Round I प्रक्रिया पूर्ण केलेल्या व विद्यापीठाने अंतिम मान्यता दिलेल्या महाविद्यालयानांच विद्यार्थी यादीस Round II ची लिंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

११. Selection Committee Report सोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

a. Attendance Report

b. Selection Committee Report with clear Remark - Selected/Not Selected

c. Valid Guideship letter

d. Research Centre Approval Letter

१२. सर्व विद्यापीठ विभाग/ सर्व संलग्नित संशोधन केंद्रांनी विद्यापीठ परिपत्रक क्र. ३८३/२०२१ व ३७३/२०२१ नुसार तसेच प्रवर्गनिहाय एकूण आरक्षणाच्या टक्केवारी बाबत शासन निर्णयातील तरतुदी व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील तरतुदी नुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

**पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया २०२१ पात्र विद्यार्थ्यांना सूचना:**

१. पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया प्रथम फेरीस अपात्र ठरलेले, अनुपस्थित राहिलेले तसेच PET Exempted पात्र विद्यार्थी पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होऊ शकतात.

२. वरील सर्व विद्यार्थ्यांना दि. २३/०४/२०२२ रोजी विद्यापीठ विभाग/संलग्नित संशोधन केंद्रावर पीएच.डी.च्या दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी उपलब्ध जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Ph.D. Admission 2021 या टॅबमध्ये "Search" या लिंकवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

३. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्यांच्या Login मधून ऑनलाइन पद्धतीने विषयनिहाय प्रवर्गनिहाय उपलब्ध जागांचा विचार करून दि. ३०/०४/२०२२ पर्यंत आवश्यकतेनुसार संशोधन केंद्र बदलण्याची कार्यवाही करावी, ज्यांनी केंद्र बदलण्याची प्रक्रिया केली नसल्यास प्रथम फेरीसाठी असलेले संशोधन केंद्रच दुसऱ्या फेरीसाठी कायम राहील.

४. पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया (PET-2021) साठी अर्ज जमा करतांना असलेल्या प्रवर्गामध्ये सन २०२१-२०२२ मध्ये निर्गमित EWS प्रमाणपत्र असल्यास सदर प्रवर्ग वगळून इतर प्रवर्गांना बदल करता येणार नाही.

५. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या संशोधन केंद्रांच्या संपर्कात राहावे. पीएच्.डी. प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीचे दि.०३/०५/२०२२ ते दि.३१/०५/२०२२ दरम्यान आयोजन करण्यात येणार आहे. त्याबाबत विद्यार्थ्यांना संबंधित संशोधन केंद्रामार्फत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मा.विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग/मा.प्राचार्य, संलग्नित संशोधन केंद्र यांची राहील. वरील सर्व प्रक्रियेमध्ये शासनाने/विद्यापीठाने निर्गमित केलेल्या शासननिर्णय, परिपत्रक यांचे तंतोतंत पालन करावे तसेच वरील प्रक्रियेबाबत विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :
Email: phdtracking_support@pun.unipune.ac.in
Phone No. : 020-71533633

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
संदर्भ : शै.प्रवेश/१९४६
दिनांक: ०७/०४/२०२२

प्रत:-

| | |
|---|---|
| मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.<br>मा. प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी. |

<u>महत्वाच्या तारखा</u>:
i) मार्गदर्शकांनी रिक्त जागा अद्ययावत करणे - दि.०७/०४/२०२२ ते दि.१७/०४/२०२२
ii) संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय रिक्त जागांना मान्यता देणे - दि.१८/०४/२०२२ ते दि.२२/०४/२०२२
iii) केंद्रनिहाय प्रवर्गनिहाय रिक्त जागांचा तपशील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन उपलब्ध करणे - दि.२३/०४/२०२२
iv) आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्र बदलण्याची प्रक्रिया करणे - दि.२३/०४/२०२२ ते ३०/०४/२०२२
v) मुलाखत प्रक्रिया दि.०३/०५/२०२२ ते ३१/०५/२०२२